विनियम क्रमांक ३२/२०२५

संत गाडगे बाबा इलेक्ट्रिक ट्रायसिकल योजना.

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ५(४७)(ज)मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठाचे उदिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद उपलब्ध आहे आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ५(३६)मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानुसार विद्यापीठ,महाविद्यालये, प्र.शाळा व परिसंस्था यांच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत निरोगी वातावरण, समूहजीवन आणि सर्वसाधारण कल्याण यांच्या अभिवृद्धीसाठी व्यवस्था करणे अशी तरतूद विहित करण्यात आलेली आहे आणि..

ज्याअर्थी, विद्यापीठांचा परिसर ४८० एकर क्षेत्रामध्ये व्यापलेला असून त्यामध्ये शैक्षणिक विभाग, प्रशासकीय कार्यालय स्थापित करण्यात आले आहे. त्यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना,व इतर दिव्यागांना ये-जा करावे लागते व त्यासाठी त्यांना लांब प्रवास करावा लागतो आणि

ज्याअर्थी, विद्यापीठ परिसरामधील दिव्यांग विद्यार्थी, दिव्यांग कर्मचारी व विद्यापीठामध्ये कामानिमित्त आलेले दिव्यांग व्यक्ती यांचे करिता संत गाडगे बाबा इलेक्ट्रिक ट्रायसिकल योजना राबविण्याबाबत दिनांक ०९.०४.२०२१ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषद मधील विषय क्र.२५ मधील प्रस्तावानुसार सोयी सवलती देणेबाबत अध्यादेशाचा मसुदा सादर करण्यात आला आणि दि.२५.०८.२०२५ रोजीची तहकुब सभा दि. २९.०८.२०२५ रोजी विषय क्र. १३१ अन्वये मान्यता प्रदान केली आणि

ज्याअर्थी, सदर योजना राबविण्याच्या दृष्टीकोनातून विनियमावली तयार करण्यात आली असून विद्यार्थी विकास मंडळ सभा दिनांक २८.०३.२०२५ रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये विषय क्र.९ नुसार प्रारुप नियमावलीस मान्यता प्रदान करण्यात आली आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ३७(१)मधील द नुसार विनियम प्रारूपास अधिष्ठाता मंडळ सभा दि.१६.०६.२०२५ विषय क्र. ५० अन्वये व्यवस्थापन परिषदेला मान्यतेकरीता सादर करण्यास शिफारस करण्यात आली. आणि

ज्याअर्थी, सदर योजना राबविण्यासाठी विद्यापीठांच्या फंडातून खरेदी केलेल्या इलेक्ट्रिक ट्रायसिकल देखरेखीवर खर्च करावा लागेल अणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम ७५ अंतर्गत व्यवस्थापन परिषद विनियम करतील अशी तरतूद आहे आणि

ज्याअर्थी, विद्यापीठांच्या शैक्षणिक विभागामध्ये शिकणा-या गरजू व होतकरू दिव्यांग विद्यार्थ्यांना व इतर दिव्यांग व्यक्तींना शैक्षणिक, क्रीडा, संशोधन आणि इतर आवश्यक शैक्षणिक गरजेपोटी लागणारे अर्थसहाय्य पुरविणे असे उद्देश आहे.

त्याअर्थी, व्यवस्थापन परिषद पुढीलप्रमाणे विनीयम विहीत करतील.

१. संत गाडगे बाबा इलेक्ट्रिक ट्रायसिकल योजना १०/२०२५ असे संबोधण्यात येईल
२. सदर विनियम व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील.

३. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरामध्ये दिव्यांग विद्यार्थी,दिव्यांग कर्मचारी व तसेच बाहेरगावचे दिव्यांग विद्यार्थी, दिव्यांग पालक, दिव्यांग कर्मचारी यांना कामाचे निमित्ताने प्रवास करणे सोयीचे होण्यासाठी तसेच विद्यापीठाचे पर्यावरण, सवंर्धनास व प्रदूषण रोखण्यास हातभार लावण्यासाठी ही योजना अंमलात आणण्यात येत आहे.

लाभार्थी व निकस

अ) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे/महाविद्यालयाचे दिव्यांग विद्यार्थी, दिव्यांग पालक, दिव्यांग शिक्षक, दिव्यांग कर्मचारी व प्रशासकीय कामासाठी येणारे दिव्यांग व्यक्ती या योजनेचा लाभ घेऊ शकतील.

ब) इलेक्ट्रिक ट्रायसिकल विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वार येथे सुरक्षा रक्षकांचे/विद्यार्थी विकास विभाग यांचे देखरेखित ठेवण्यात येतील.

क) इलेक्ट्रिक ट्रायसिकलचा वापर करण्याकरीता मुख्य प्रवेशद्वाराजवळ असलेले सुरक्षा रक्षक यांचे कार्यालयात असलेल्या रजिस्टरमध्ये नोंद करणे आवश्यक राहील.

ड) इलेक्ट्रिक ट्रायसिकलचा वापर करण्यासाठी बाहेरून आलेले दिव्यांग विद्यार्थी, दिव्यांग पालक, दिव्यांग कर्मचारी यांचे दिव्यांगाचे प्रमाणपत्राची सत्यप्रत्य आवश्यक राहील व पुढीलपैकी एक ओळखपत्र सुरक्षा रक्षकाकडील रजिस्टरमध्ये नोंद करून त्याची सत्य प्रत जमा करणे आवश्यक राहील.१) आधारकार्ड २) पॅनकार्ड ३) महाविद्यालयाचे ओळखपत्र (फोटो प्रमाणित केलेला असावा) ४) निवडणूक ओळखपत्र ५) बँकेचे पासबुक इत्यादी.

इ) इलेक्ट्रिक ट्रायसिकल नुकसान किंवा मोडतोड झाल्यास किंवा चोरी झाल्यास त्याचा खर्च संबधिताकडून वसूल करण्यात येईल. व झालेल्या नुकसानीचे अंदाजित खर्च (रक्कम) मुख्य प्रवेशद्वाराजवळ सुरक्षा रक्षक यांनी सुचविल्याप्रमाणे जमा करणे अनिवार्य राहील. नुकसान झाल्याची माहिती संबधित विभागांकडे सुरुक्षा रक्षक देतील. व संबधित विभाग झालेल्या नुकसानीची शहानिशा करून खर्च (रक्कम) निश्चित करेल. नुकसान भरपाई देण्यास नकार दिल्यास संबधित दिव्यांगाविरूद्ध नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यास संबधित दिव्यांग विद्यार्थ्यांचे महाविद्यालय/दिव्यांग कर्मचा-यांचे कार्यालय/ पोलिस प्रशासनाद्वारे करण्याकरिता विभागामार्फत कळविण्यात येईल.

ई) विभागाकडील सायकल योजनेमधील राखीव निधीतून दैनदिन/दरमहा इलेक्ट्रिक ट्रायसिकल ची देखभाल दुरुस्ती करण्यात येईल.(ट्रायसीकल इलेक्ट्रिक असल्याने दैनदिन किमान १० कि.मि. वापर होणे अनिवार्य आहे. त्याशिवाय चार्जिंग होत नसल्याने त्याची देखभाल दुरुस्ती दैनदिन/दरमहा करणे अनिवार्य राहील.)

फ) इलेक्ट्रिक ट्रायसिकलचे सुटे भाग खराब झाल्यास विकत घेणे अथवा दुरुस्ती करण्याचे अधिकार संबधित विभागाकडे राहील.

ग) इलेक्ट्रिक ट्रायसिकल वापरण्याबाबतचे निकस आवश्यकतेप्रमाणे बदल करण्याचे अधिकार संबधित विभागाकडे राहील.

*****